PC- 76

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**
**व**
**संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय**
**विद्यार्थी विकास मंडळ**
**लॅपटॉप दुरूस्ती कार्यशाळा २०१७-१८**

शनिवार, दि.१०/०२/२०१८

## कार्यशाळा अहवाल

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व संस्कार मंदिर संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इतर शैक्षणिक उपक्रमांतर्गत "लॅपटॉप दुरूस्ती कार्यशाळेचे" आयोजन करण्यात आले होते. सदर योजनेसाठी महाविद्यालयाने विद्यापीठाकडे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी दि.२९/०६/२०१७ प्रस्ताव पाठविला होता. सदर प्रस्तावानुसार विद्यापीठाने महाविद्यालयास विद्यापीठ मान्यता संदर्भ पत्र क्र. विविमं/२०१७-१८/४९६ दि.२८/११/२०१७ नुसार मान्यता देऊन कार्यशाळेच्या खर्चाच्या परीपूर्तीसाठी रू.१0,000 (अक्षरी रू.दहा हजार फक्त) अनुदान मान्य केले आहे.

लॅपटॉप दुरूस्ती कार्यशाळेचे आयोजन शनिवार, दि.१०/०२/२०१८ रोजी करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी ठिक ९.३० वाजता संस्कार मंदिर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री.दिलीप बराटे यांच्या हस्ते झाले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात "लॅपटॉप व टेक्नॉलॉजी हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील अविभाज्य घटक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता टेक्नॉलॉजी अत्यंत आवश्यक आहे, तसेच पुण्यातील हिंजवडी येथील IT पार्कमुळे विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत", असे विचार मांडले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप भोईटे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रांजली